माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ३००२/२०२२**

**अपिलार्थी, श्रीमती दुर्गावती अरविंद मिश्रा**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर

**द्वितीय अंपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०७.२०२२ | निरंक | ०८.०९.२०२२ | ०७.१०.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १३.०७.२०२२** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दिनांक १६.०७.२०२१ व दिनांक ०९.०२.२०२२ रोजी केलेल्या तक्रारीनुसार केलेल्या कार्यवाहीची सत्यप्रत देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतीसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०८.०९.२०२२** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.१०.२०२२ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी यांनी याआधीच तक्रार अर्ज मा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे प्रलंबित असल्याचा प्रतीसाद दिला आहे, असे आदेशीत करुन अपील निकाली काढण्यात आली आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नु आयोगाकडे **दिनांक १०.११.२०२२** रोजी "योग्य माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमुद करून द्विती अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **२८.०८.२०२३** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा **अधिक्षक** श्रीमती रु. वि. भोवते उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा **सहाय्यक धर्मदाय आयुक्त** श्री. महेश ठोंबरे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१.०९.२०२२ रोजी दिलेल्या प्रतिसादात उपरोक्त तक्रार अर्ज चौकशी कामी मा. धर्मदाय सहआयुक्त यांचेकडे प्रलंबित असल्याचा प्रतिसाद दिला. वरील प्रतिसाद असमाधानकारक असल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला असुन त्यावर दिनांक ०७.१०.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली असुन अपिलार्थी हजर नसल्यामुळे त्यांची बाजु ऐकुन घेता आली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी याआधीच तक्रार अर्ज मा. धर्मदाय सहाय्यक आयुक्त यांच्याकडे प्रलंबित असल्याच्या प्रतिसाद दिला असल्याची बाब लक्षात घेता, वरील अपील अर्ज निकाली काढण्यात आला असल्याचे आढळुन येते. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १०.११.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असुन, मिळालेली माहिती ही अपुर्ण व दिशाभुल करणारी असुन तसेच प्रथम अपील आदेश हा एकतर्फी पारित करण्यात आला असल्याचे नमुद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी दिनांक ०७.१०.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात अपिलार्थी त्यांची बाजु ऐकुन न घेता पारित केला असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, पुन:श्च एकदा मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस लेखी सुचना देवून सुनावणी आयोजित करावी. सुनावणीची लेखी सुचना संबंधितांना बजावून दोन्ही पक्षाची बाजू ऐकुन स्वयंस्पष्ट आदेश पारीत करुन अपील अर्ज निकाली काढण्यात यावा. यात दिनांक १६.०७.२०२१ व दिनांक ०९.०२.२०२२ च्या कथीत स्टॅम्प पेपरच्या आधारे रामचंद्र देवस्थान यांची स्थापना करण्यात आली आहे. तो स्टॅम्प पेपर हा बनावटी खोटा असुन प्रस्तुत तक्रार देखील स्ययंस्पष्ट असुन खोटे असल्याने त्याबाबतची तक्रार प्रलंबित आहे.

मात्र असे करीत असतांना मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १८.०१.२०१३ रोजी जारी केलेले स्वयंस्पष्ट परिपत्रक देखील विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या माहितीस्तव प्रदान करण्यात यावे. वरील परिपत्रकानुसार शासकीय कार्यालयात माहिती प्राप्त झाले निवेदन अर्ज अथवा तक्रार यावर १२ आठवड्यात मुळ कार्यवाही करण्याबाबत स्वयंस्पष्ट सुचना देण्यात आल्या असुन वरील पत्र परिपत्रक मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल रीट याचीका ६७३/२०१२ यात मा. उच्च न्यायालयाने केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जारी करण्यात आले आहे व या परिपत्रकामध्ये जनतेच्या शासकीय कार्यालयीन अथवा प्राधिकरण यांच्याकडे प्रलंबित असणारी कामे लवकर होण्याच्या दृष्टीने तसेच महराष्ट्र शासकीय कर्मचारी व शासकीय कामकाजात होणाऱ्या विलंबास पार पाडणे अधिनियम २००५ व दफ्तर दिरंगाई कायदा यातील देखील निर्गमित करण्यात आले असुन अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जावर प्रशासकीय पातळीवर निर्णय घेतांना वरील परिपत्रकातील तरतुद लक्षात ठेवून निर्णय घेण्याच्या सुचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते ★ नागपूर ★

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०८.२०२३**

जावक क्रमांक EE102 दिनांक 6 DEC 2023